# Gopal Tiwari

**MEMBER**
**All India Congress Committee**
**EX. COUNCILLOR**
**Pune Muncipal Corporation**
**MEMBER**
**D A C, under Ministry of Non Conventional Energy Resources, Govt. of India**

Tele : (020) 24495161
Telfax : (020) 24495060
Cell : 91+9822258860

INDIAN NATIONAL CONGRESS


**Recipient :- "BHARAT JYOTI AWARD" (2008) ● "BEST CITIZEN OF INDIA" AWARD (2009), New Delhi**

प्रति,

दि. ०९.०७.२०११

मा. ना. श्री. पृथ्वीराजजी चव्हाण
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.मुंबई.
आदरणीय बाबा,

महाराष्ट्र शासनाच्या 'तंत्रशिक्षण मंत्रालयाने' (शैक्षणिक वर्ष २०११-१२) करीतां तंत्र शिक्षण अभ्यासक्रमासाठी (उदा. इंजिनिआरंग, फार्मसी, कॉम्प्युटर, सायन्स इ.) करितां प्रवेश घेण्याकरिता आवश्यक असलेल्या मार्कांच्या पात्रतेत ५% टक्क्यांना शिथिलता केली आहे, म्हणजेच वरील 'पदवी अभ्यासक्रम' करीतां (१२ वी परीक्षेत) ५०% करुन ४५% वर व राखीवांसाठी ४५% वरुन ४०% वर आणून 'व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम' करीतां विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात प्रवेश उपलब्ध करुन दिल्याबद्दल, आपले **मनःपूर्वक अभिनंदन!** त्याच धर्तीवर 'बी.एड्.' करीतां देखील १२ वी मधील मार्क्संची पात्रता ५० व ४५ टक्क्यांवरुन अनुक्रमे ४५ व ४०% वर आणावी ही विनंती.

तसेच तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाकरीता (उदा. डिप्लोमा इंजिनिअरिंग/हॉटेल मॅनेजमेंट) इ. ची किमान पात्रता (१० वी उत्तीर्ण )५० टक्क्यावरुन ३५% वर आणली त्याच धर्तीवर 'डी.टी.एड्.' करीता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे बाबतीतही लागू करावे.

'अध्यापन' या शाखेकडे प्रवेश घेण्याचा ग्रामीण भागातील असंख्य विद्यार्थ्यांचा कल असतो. व त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील 'आर्थिक' दुर्बल असतात. त्यामुळे शासनाने 'तंत्र शिक्षणाचा डीप्लोमा' कोर्स करीतां **आवश्यक मार्क मधील 'शिथिलतेचे धोरण'** अध्यापन कोर्स करीतां राबविल्यास ''विद्यार्थीभिमुख'' धोरणामुळे ग्रामीण भागातील असंख्य विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाबरोबरच शिकविण्याचा सेवाभाव व आवड असणाऱ्या, परंतु थोडे फार मार्क कमी मिळालेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळेल **त्यांना देखील ग्रामीण भागातच रोजगाराची संधी मिळेल व ग्रामीण भागातील शैक्षणिक उत्क्रांतीचा दर वाढण्यास देखील**, हे धोरण सहाय्यभूत ठरेल असे आम्हांस वाटते.

तरी इतर कोर्सेस प्रमाणे 'अध्यापन पदवी व पदविका बाबत चे धोरण २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासूनच अंमलात आणावे ही पुनश्च नम्र विनंती आहे.

कृपया कळावे.

**आपले विश्वासू,**

(गोपाळ तिवारी)
सदस्य-अ.भा.काँग्रेस महासमिती
पुणे

(राजीव जगताप)
संस्थापक अध्यक्ष-अभिनव शिक्षण संस्था
पुणे

**PRESIDENT**
**ABHINAV EDUCATION SOCIETY**
**Dhankawadi, Pune-411 043.**


**Resi.: 'Akshay' 216, Narayan Peth, N.C. Kelkar Road, Pune 411 030. Maharashtra**
**E-mail : gopaltiwari@rediffmail.com**